दै. गोदातीर दि. 11-05-24

# खूनाचा प्रयत्न करुन फरार झालेला आरोपी पिस्टलसह ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड-** दि. १० मे रोजी रोजी लालवाडी पुलाजवळ एक इसम गावठी पिस्टल बाळगुन असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली. पोउपनि साईनाथ पुयड व पोलीस अंमलदार यांनी लालवाडी पुलाजवळ सापळा लावून अतिष विष्णु सुर्यवंशी यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व एक मोबाईल असा ३० हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

शहरात गुन्ह्यांना आळा बसविण्यासाठी व पाहिजे/फरारी आरोपीचा शोध घेवून अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी शहरात पाहिजे/फरारी आरोपींना अटक करण्याबाबत स्थागुशाचे पथकाला आदेश दिले होते.

सदरचा आरोपी हा १. पो. स्टे. भाग्यनगर गु.र.नं. २७२/२०२३ कलम ३०७, ३२६, १४३, १४७, १४९ भा.दं.वि., २. पो. स्टे. शिवाजीनगर गु.र.नं. १४७/२०२४ कलम ३२४, ५०४, ३४ भा.दं.वि. हे गुन्हे करुन, सदर गुन्हयात अटक करणे आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोउपनि साईनाथ पुयड, पोलीस अंमलदार माधव केंद्रे, गुंडेराव करले, दिपक पवार, किशन मुळे, देवा चव्हाण, तानाजी येळगे, गजानन बयनवाड, मोतीराम पवार, ज्वालासिंघ बावरी, मेहजबीन शेख यांनी पार पाडली आहे.